**2019 III 01** **1000** **Seat No.** | | | | | |

**Time : 2½ Hours** **MARATHI LANGUAGE I**

**Subject Code**

| H | 4 | 1 | 2 |
|---|---|---|---|

**Total No. Of Questions : 8** **(Printed Pages : 4)** **Maximum Marks : 80**

***सूचना :—*** (*i*) शुद्धलेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(*ii*) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

1. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. **[5]**

1) ''तर आवं, एकदा आमच्या गावातल्या सोनारावर भूत झालं लई खूश''.

2) 'स्वप्न, स्वप्न, स्वप्न, स्वप्ने विचारांमध्ये रूपांतरित होतात आणि विचार कृतीमध्ये !'

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळींत लिहा. **[5]**

1) परीक्षेत वीज जाण्याची शक्यता असल्यामुळे मानसीच्या पालकांनी तिच्याकडून कोणते सराव करवून घेतले ?

2) ध्वनि प्रदूषणाबद्दल अभियंत्याने कोणते स्पष्टीकरण दिले ?

2. अ) खालीलपैकी कोणत्याही **एकाचे** संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. **[5]**

1) बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी ।
ओव्या गाऊं बसूनि तूं येरे बा विठ्ठला ।।

2) झाला भुईचा दुष्मान दुष्ट दुष्काळ सारखा
आटलेला हा पाऊस ढगा-जगाला पारखा

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर **7** ते **8** ओळींत लिहा. **[5]**

1) देशवासीयांना कवी कुसुमाग्रजांनी कोणते आवाहन केले आहे ?

2) कवयित्री शांता शेळके यांनी स्त्रियांच्या जगण्याचे चित्रण कसे केले आहे ?

3. अ) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा. [5]

1) कोकणातल्या बाबल्याचे नंदनवन कोणते ?
2) 'शांतिसदन' का बांधले होते ?
3) डोक्यावरच्या जखमेमुळे रक्तबंबाळ होउन कोण डोकं धरून बसला होता ?
4) पुण्याचा बंगला लेखकाने कुणाला भाड्याने दिला होता ?
5) रेखाटणांसाठी श्रीधर अंभोरे यांचा अतिशय आवडता विषय कोणता ?

ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **एका** वाक्यात लिहा. [5]

1) संत-समुदाय भेटल्यानंतर काय करावे असे संत नामदेव सुचवितात ?
2) अरुवार म्हणजे काय ?
3) कोंबातून प्रगटलेली दोन पाने कशी दिसतात ?
4) प्रल्हाद केशव अत्रे यांचे टोपणनाव काय ?
5) नायिकेच्या स्वप्नात तिच्यामागे कोण धावत आहेत ?

4. अ) खालील शब्दांसाठी पारिभाषिक शब्द लिहा. [2]

1) Elocution 2) Felicitation

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** म्हणीचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. [2]

1) दाम करी काम 2) काखेत कळसा गावाला वळसा

क) खालीलपैकी कोणत्याही **एका** वाक्प्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. [2]

1) कात्रीत सापडणे 2) फुफाटून झेप घेणे

ड) खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा. [4]

1) त्यानं संपर्क यंत्रणा चालू केली आणि तो बाहेर पडला.
2) चित्रं काढून दिली आणि ती गेली.

5. अ) खालील शब्दांचे **विरुद्धार्थी** शब्द लिहा. [3]

1) अंधार 2) गैरसोय 3) होकार

ब) खालील शब्दांचे **समानार्थी** शब्द लिहा. [3]

1) पाणी 2) जंगल 3) डोळे

क) खालील वाक्यात विरामचिन्हे घालून त्या वाक्यांचे पुनर्लेखन करा. **[2]**

1) ते दु:खाश्रू होते की आनंदाश्रू निश्चितच आनंदाश्रू
2) मग मला वाटायचे की ही चित्रे आपल्यासारखीच आहेत.

ड) खालील वाक्य शुद्ध करून लिहा. **[2]**

आयी-वडिलांबरोबर जायचो आणि ते पैसे साटवून पुढच्या वर्षासाठी कपडे किंवा पुस्तकासाठी जमवायचो, आपणच खमवायचं आणि आपणच खर्च करायचे असं चालायजं.

6. अ) खालील उताऱ्याचा सारांश **एक** तृतीयांशापर्यंत लिहा. **[5]**

सर म्हणाले, ''कागदाची पुस्तके तुम्ही नेहमीच शिकता. इथं काळजाची पुस्तकं वाचा. पुस्तकांतून जीवन दिसतं; पण पाठ्यपुस्तकां एवढंच जीवन नसतं. खिडकीतून आकाश दिसतं; पण खिडकी म्हणजे आकाश नसतं. मुलांनो, तुम्ही सगळे सुशिक्षित घरातील, जे जे तुम्हांला हवंय ते ते त्वरित तुमच्या हातात हजर करणाऱ्या सुखवस्तू पालकांची तुम्ही मुलं आहात; पण त्यामुळेच तुमचा असा समज झाला आहे की-जीवन फार सोपं आहे. नाही, जीवनाचे दाहक रूप इथे तुम्हांला दिसेल. तुमच्याच वयाची मुलं, त्यांच्या इथल्या शाळा बघा, घरं बघा त्यांचं अन्न बघा, कपडे बघा. शिबिर म्हणजे पिकनिक नाही. स्वत:ला आतून विकसित करणारा हा रियाज़ आहे. इथला प्रत्येक क्षण ज़गून घ्या. शिबिर संपून तुम्ही घरी जाल तेव्हा तुम्हांला जाणवेल, आलात तेव्हाचे तुम्ही निराळे होतात आणि निघाल तेव्हा तुम्ही थोडे मोठे होऊन, प्रगल्भ होऊन जाणार आहात, असं झालं तरच शिबिराला काही अर्थ आलेला असेल !''

– प्रवीण दवणे
पान क्रमांक 64
'केवड्याचे पान'

ब) खालील कविता वाचून त्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

हिरवी झाडे हिरव्या वेली, पानफुलांवर प्रेम करा ।
ही तर अपुली मित्रमंडळी नित्य तुम्ही हे ध्यानी धरा ।। धृ।।

ताप उन्हाचा स्वत: साहूनी, सकला देती सदा साऊली
घरत्यांना ह्रदयाशी घेऊनी, पक्ष्यांची होतात माऊली
भेद तयांच्या नसे अंतरी, प्रेमाचा हा मंत्र खरा ।।१।।

वायू विषारी करिती निर्मळ, शत्रू हे तर प्रदुषणाचे
पाऊस यांचा सखासोबती, स्नान घालतो जलधारांचे
धरणीच्या अंतरी झुळझुळे, संजीवनाचा गोड झरा ।।२।।

ओलाव्याचे शीतल अमृत, झाडे देती या जगताला
रोगराईला दूर सारूनी, प्रसन्न करिती कणाकणाला
वृक्षसंपदा जपून ठेवा, सुखसमृद्धी येई घरा ।।३।।

— वंदना विटणकर

**प्रश्न :**

1) कवयित्री मित्रमंडळी म्हणून कुणाचा उल्लेख करते ? **[1]**

2) प्रेमाचा मंत्र जपणारी झाडे कशी वागतात ? **[2]**

3) धरणीच्या अंतरात काय झुळझुळत आहे ? **[1]**

4) घरात सुखसमृद्धी हवी तर काय करावे लागेल ? **[1]**

7. अ) वसुंधरा उच्च माध्यमिक विद्यालय, बागवाडा–फोंडा येथे संपन्न झालेल्या प्रजासत्ताकदिनाचा वृत्तांत 10 ते 12 ओळींत लिहा. **[5]**

ब) दै. जनमतमध्ये आलेली खालील जाहिरात वाचून आपण अशोक देसाई/अमिता देसाई, 'रानवारा', 232, काणका, शिवोली–गोवा. असे समजून खाली नमूद केलेल्या पदासाठी अर्ज करा. **[5]**

दै. जनमत

दिनांक : 2 मार्च 2019

पाहिजे

पर्यवेक्षक

शैक्षणिक पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर

वाणिज्य पदवीधरास प्राधान्य

संगणकाचे ज्ञान अत्यावश्यक

अनुभव : कमीत कमी तीन वर्षे

संपर्क/अर्ज करा

व्यवस्थापक, समाधान पॅकेजींग

श्रीस्थळ औद्योगिक वसाहत, श्रीस्थळ–काणकोण, गोवा.

8. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **25** ओळींचा निबंध लिहा. **[10]**

1) रस्ता अपघात: जबाबदार कोण ?

2) मोबाईल नसता तर . . .

3) जखमी खेळाडूचे आत्मवृत्त

4) माझ्या गावची जत्रा.